ePaper **आम्ही सभागृहात गोट्या खेळायला येतो का?: आमदार सुरेश धस**




| वर्ष - 7 | अंक - 85 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!


## आतील पानांत


- 16 आमदार अपात्रता प्रकरण
- 'इंडिया' नावावर मोदींचे टिकास्र
- ड्रीम गर्ल आयुष्मान
- पंत आयपीएल खेळणार नाही?



www.mahaenews.com | बुधवार, दिनांक 26 जुलै 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews


# पर्यावरण सद्यस्थितीचे मूल्यांकन!

## »अहवालाचे सादरीकरण: सकारात्मक उपाययोजनांची अपेक्षा

। पिंपरी
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड शहरात राबविण्यात येणारे विकास प्रकल्प, पायाभूत सुविधा व त्यांचे शहराच्या पर्यावरणावर होणारे परिणाम यांचे मुल्यांकन करणारा सन २०२२-२३ चा 'पर्यावरण सद्यस्थिती अहवाल' आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्याकडे आज झालेल्या विशेष बैठकीत सादर करण्यात आला.**



महापालिकेच्या पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय इमारतीत झालेल्या विशेष बैठकीस अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, उल्हास जगताप, शहर अभियंता मकरंद निकम, आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे, वायसीएमचे अधिष्ठाता डॉ. राजेंद्र वाबळे, मुख्य लेखा परिक्षक प्रमोद भोसले, मुख्य लेखाधिकारी जितेंद्र कोळंबे, सह शहर अभियंता श्रीकांत सवणे, रामदास तांबे, संजय कुलकर्णी, सह आयुक्त चंद्रकांत इंदलकर यांच्यासह उप आयुक्त, सहाय्यक आयुक्त, क्षेत्रिय अधिकारी, कार्यकारी अभियंता तसेच विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

शहरवाढीला चालना देणारे घटक, नैसर्गिक साधनसंपत्ती व नागरी सुविधांवर पडणारा ताण, शहराची पर्यावरण सद्यस्थिती, पर्यावरणीय परिस्थिती सुधारण्यासाठी केलेल्या उपाययोजना आणि कृती कार्यक्रम यांची माहिती या अहवालात आहे. या अहवालानुसार पिंपरी चिंचवड शहरातील एकूण लोकसंख्येपैकी ८९.२२ टक्के लोकसंख्या साक्षर असून त्यात पुरूष ९२.४१ टक्के तर स्त्रियांचे प्रमाण ८५.३७ टक्के आहे. सन २०२१-२२ मध्ये पिंपरी चिंचवड शहरात कोरोनामुळे श्वसन संस्थेच्या आजाराच्या रुग्णसंख्येत तसेच डासांमुळे होणाऱ्या आजारांच्या रुग्णसंख्येत वाढ दिसून येत आहे. तर महापालिकेमार्फत चालविल्या जाणाऱ्या शाळांमधील विद्यार्थी संख्येत वाढ दिसून येत आहे. कोविड काळात कमी झालेली वाहन नोंदनी पुन्हा पुर्ववत होत असून पेट्रोल, डिझेल इंधनावर चालणाऱ्या वाहनांची संख्या ६७ टक्के असून ई-वाहनांची संख्या ७ टक्के आहे. सन २०२२-२३ मध्ये ई-वाहन वापरण्यावर नागरिकांनी भर दिला आहे. वाढत जाणाऱ्या वाहनसंख्येचा शहराच्या रस्तेवाहतुकीवर विपरित परिणाम होऊन वाहतूक कोडीं सारख्या समस्यांमध्ये वाढ होऊ शकते असा निष्कर्ष या अहवालात काढण्यात आला आहे.

शहराचे सरासरी तापमान २५.५ अंश सेल्सिअस असून मे महिन्यामध्ये सर्वाधिक म्हणजेच सरासरी ३६ अंश सेल्सिअस तर हिवाळ्यात ११ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली आहे. मागील तीन वर्षांच्या तुलनेत हवेतील धुलिकणांमध्ये वाढ झाली आहे. शांतता क्षेत्र तसेच रहिवासी क्षेत्रामध्ये ध्वनीपातळी ही निर्धारित पातळीपेक्षा जास्त आहे.

शहराचा विस्तार व वाढती लोकसंख्या यामुळे पाण्याच्या मागणीमध्ये वाढ होऊ शकते असे या अहवालात नमुद करण्यात आले आहे. तर वाहतूक आणि दळणवळणाच्या सुविधा, रोजगार, व्यापार, शिक्षण, आरोग्य, क्रिडा, सांस्कृतिक तसेच मनोरंजन, क्षेत्रातील पायाभूत सुविधांमुळे पिंपरी चिंचवड शहराचे आकर्षण वाढले असल्याचे या अहवालात नमूद करण्यात आले आहे. महापालिकेच्या वैद्यकीय सेवांची आकडेवारी देण्यात आली असून महापालिकेच्या विविध रुग्णालये आणि दवाखान्यांमध्ये दररोज ४ हजार ३५७ बाह्यरुग्ण उपचारासाठी येतात तर वर्षभरात ५३ हजार १४४ व्यक्ती आंतररुग्ण म्हणून दाखल झाले आहेत. शहरातील सल्फरडाय ऑक्साईड, नायट्रोजन ऑक्साईड, धुलीकण, अतिसुक्ष्म धुलीकणांची पातळी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या मानांकणानुसार विहीत मर्यादेमध्ये असल्याचा निष्कर्ष अहवालात नमूद करण्यात आला आहे. मेट्रोमुळे शहरातील वाहतूक सुविधा सुलभ होणार असून वायु, ध्वनी, रस्त्यावरील ताण आणि वाहतूक कोंडी यावर सकारात्मक परिणाम होणार आहे. गणेशोत्सव, दिवाळी उत्सव तसेच उन्हाळा, पावसाळा, हिवाळ्यातील ध्वनी पातळीची आकडेवारी अहवालात नमूद करण्यात आली आहे.

### विविध चाचण्यांवर आधारित अहवाल...



» पर्यावरण सद्यस्थिती अहवालात महापालिकेचे विविध विभाग, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, विविध शासकीय, निमशासकीय कार्यालये यांच्याकडून प्राप्त झालेली पर्यावरणविषयक माहिती तसेच स्कायलॅब या संस्थेने महापालिका क्षेत्रातील विविध ठिकाणी केलेल्या वायू, ध्वनी, पाणी इत्यादी चाचण्यांच्या निकषांवर पर्यावरण सद्यस्थिती अहवाल आधारित आहे, असे पर्यावरण विभागाचे सह शहर अभियंता संजय कुलकर्णी यांनी यावेळी सांगितले.

# मावळातील प्रश्नांकडे आमदार शेळकेंनी वेधले सभागृहाचे लक्ष

## »पावसाळी अधिवेशनात आमदार सुनिल शेळके यांनी मांडले प्रलंबित प्रश्न

। वडगाव मावळ । महाईन्यूज ।

**पावसाळी अधिवेशनात पुरवणी मागण्यांवरील चर्चेत सहभाग घेत आमदार सुनिल शेळके यांनी (सोमवार दि.२४)अनेक प्रश्न मांडत सभागृहाचे लक्ष वेधले. मावळ तालुक्यात अनेक ठिकाणी रस्त्यांची कामे पूर्ण झाली आहेत.परंतु काही ठिकाणी निकृष्ट दर्जाची कामे केल्यामुळे अवघ्या महिनाभरात रस्त्यांवर खड्डे पडले आहेत.**



त्यामुळे नागरिकांसह पर्यटकांना देखील त्रास सहन करावा लागत आहे. लोकप्रतिनिधी विकासकामांसाठी निधी आणण्याचे काम करतात.परंतु रस्त्यांची गुणवत्ता राखण्याची जबाबदारी अधिकाऱ्यांची आहे.अशा रस्त्यांवर जर अपघात झाले तर याला जबाबदार असणारे अधिकारी व ठेकेदार यांच्यावर गुन्हे दाखल करावेत,अशी मागणी आमदार सुनिल शेळके यांनी सोमवारी पावसाळी अधिवेशनात केली.

आमदार शेळके म्हणाले की,नाणोली येथे पुल नसल्याने जीव धोक्यात घालून आजही बोटीने प्रवास करावा लागतो.अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या व अनेकदा निधीची मागणी करुनही निधी मंजूर न झालेल्या कुंडमळा येथील पूल, वराळे-नाणोली पूल, सांगवडे-मामुर्डी पूल या पुलांसाठी निधी द्यावा.अशीही मागणी केली. याशिवाय,ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शाळेत जाण्या-येण्यासाठी वेळेवर एसटी बसची सोय नसल्याने आजही अनेक विद्यार्थी पायपीट करत शाळेमध्ये शिक्षणासाठी येतात.त्यांची गैरसोय दूर करण्यासाठी आमदार निधीतून सायकली वाटप किंवा बसेस सुरु करण्यासाठी मंजुरी द्यावी,अशीही मागणी आमदार शेळके यांनी केली.

### अजित पवारांचे मानले आभार

»"मागील साडेतीन वर्षात मावळ तालुक्यातील प्रशासकीय इमारत,नदीवरील पुल, उपजिल्हा रुग्णालये, तलाठी कार्यालये यांसह तालुक्यातील विविध रस्त्यांच्या कामांसाठी कोट्यावधी रुपयांचा निधी उपलब्ध करुन दिला. त्याबद्दल उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे आभार आमदार सुनिल शेळके यांनी व्यक्त केले."

# 2024 मध्ये महाराष्ट्रातील 45 पेक्षा जास्त खासदार महायुतीचे असतील!

## भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केला विश्वास

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**निवडणुकीच्या वेळी महायुतीमधील घटक पक्षाच्या उमेदवारांना भाजपा आपल्या उमेदवाराला जेवढी ताकद देईल त्यापेक्षाही अधिक ताकद महायुतीमधील घटक पक्षाच्या उमेदवाराला देईल, असा दावा भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांना केला.**



2024 मध्ये मोदीजी जेव्हा पंतप्रधानपदाची शपथ घेतील त्यावेळी त्यांच्यासोबत महाराष्ट्रातील 45 पेक्षा अधिक खासदार असतील. रायगड, बारामती, शिरूर आणि शिर्डी यांच्यासह हातकंगणले, कोल्हापूर, माढा , सातारा या लोकसभा मतदारसंघाची आढावा बैठक आज त्यांनी पुणे येथे घेतली.

पत्रकारांना त्यांनी सांगितले की, लोकसभा निवडणुकीसाठी भाजपा बुथस्तरापर्यंत संपूर्ण कार्यक्रमाची रचना करीत आहोत. लोकसभा प्रवास योजनेत 500 पेक्षा अधिक पदाधिकारी व त्यांची टीम काम करणार आहे.

त्यासाठी संपर्क से समर्थन व नवमतदार नोंदणी केली जात आहे. राज्यातील व केंद्रातील मंत्री आगामी 2 महिन्यात राज्याचा दौरा करतील. राजकीय व विकासात्मक तयारी केली जात आहे. जनतेपर्यंत सरकारच्या योजना पोहचविण्याचे काम केले जात आहे. अतिवृष्टीग्रस्तांना मदत जाहीर केली. तर आगामी वर्षभरात 50 हजार रुग्णमित्र तयार केले जातील. मोदीजींच्या संकल्पाला साथ देण्यासाठी मतदार साथ देत असल्याचे त्यांनी सांगितले.

### जागा वाटपाचा अधिकार केंद्रीय बोर्डाला

**» उपमुख्यमंत्री अजित पवार जेव्हा महायुतीमध्ये आले तेव्हा ते सर्व बाबींचा विचार करून आले आहेत. महायुतीवर शंका घेण्याचे कारण नाही, महायुती कमजोर होणार नाही यासाठी तिन्ही पक्ष काळजी घेत आहेत. जागा वाटपाचा संपूर्ण अधिकार हा केंद्रीय संसदीय बोर्डाला आहे. राज्यातील तिन्ही नेते व केंद्रीय संसदीय बोर्ड उमेदवार ठरवितील.**

---

# 48 तासांमध्ये नवीन वीजजोडणी

## तीन महिन्यांत 60 हजार वीजजोडण्या

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुणे परिमंडल अंतर्गत अस्तित्वात असलेल्या यंत्रणेमधून वीजभाराच्या मागणीसह वीजजोडणी देणे शक्य आहे अशा ठिकाणी आवश्यक कागदपत्रांची पुर्तता करून फर्म कोटेशनच्या रकमेचा भरणा केल्यास तेथील ग्राहकांकडे महावितरणकडून शहरी भागात अवघ्या 24 तर ग्रामीण भागात 48 तासांमध्ये नवीन वीजजोडणी कार्यान्वित करण्यात येणार आहे. याबाबतचे निर्देश मुख्य अभियंता राजेंद्र पवार यांनी सर्व कार्यालयांना दिले आहेत.**



### रकमेचा भरणा केल्यास त्वरित वीज

» नवीन वीजजोडणीचा अर्ज दाखल झाल्यानंतर जोडणीच्या ठिकाणी महावितरणच्या कर्मचाऱ्यांकडून तांत्रिक व्यवहार्यता तपासली जाते. त्यानंतर वीजजोडणीचे कोटेशन तयार करून संबंधित ग्राहकांना देण्यात येते. कोटेशनच्या रकमेचा भरणा केल्यानंतर संबंधित ग्राहकांना नवीन वीजजोडणी दिली जाते. सिंगल किंवा तीन फेजच्या नवीन एका वीजजोडणीसाठी 20 किलोवॅट किंवा 27 एचपीच्या वीजभारापर्यंतची सर्व प्रक्रिया शाखा कार्यालयांकडून करण्यात येत आहे. त्यावरील 50 किलोवॅटपर्यंतच्या वीजजोडणीची प्रक्रिया उपविभाग कार्यालयांकडून केली जाते.

नवीन वीजजोडण्या देण्यास महावितरणने मोठा वेग दिला असून पुणे परिमंडलामध्ये गेल्या एप्रिल ते जूनपर्यंतच्या केवळ तीन महिन्यांत 60 हजार 970 नवीन वीजजोडण्या देण्यात आल्या आहेत. राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नवीन वीजजोडण्यांना वेग देण्याची सूचना केली आहे. महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी याबाबतची कार्यवाही त्वरित करण्याचे निर्देश दिले आहेत. सोबतच पुरेशा प्रमाणात नवीन वीजमीटर देखील उपलब्ध करून दिले आहेत. वीजमीटरची उपलब्धता व नवीन वीजजोडण्यांबाबत संचालक संजय ताकसांडे यांच्याकडून सातत्याने आढावा घेण्यात येत आहे.

त्यानुसार पुणे परिमंडल अंतर्गत पुणे व पिंपरी चिंचवड शहरासह हवेली तालुका तसेच मुळशी, वेल्हे, मावळ, खेड, जुन्नर व आंबेगाव तालुक्यांचा समावेश आहे. या सर्व भागात अस्तित्वात असलेल्या वीजयंत्रणेमधून ग्राहकांच्या मागणीनुसार वीजभारासह नवीन वीजजोडणी देणे शक्य असल्यास शहरी भागात 24 तासांत तर ग्रामीण भागात 48 तासांमध्ये नवीन वीजजोडणी देण्यात येणार आहे.

---

# बॉम्ब बनविण्याचे अन् स्फोटाचे प्रशिक्षण

। पुणे । महाईन्यूज ।

पुणे पोलिसानी कोथरूड भागात नाकाबंदीत पकडलेल्या दोन दहशतवाद्यांनी बॉम्ब बनविण्याचे आणि स्फोटाचे प्रशिक्षण घेतल्याची धक्कादायक बाब उघडकीस आली आहे. दहशतवाद विरोधी पथकाने न्यायालयात सादर केलेल्या एका अहवालातून ही बाब समोर आले. तसेच, आरोपींवर दाखल गुन्ह्यात बेकायदेशीर कारवाया प्रतिबंधक कायद्यान्वये कलम वाढ करण्यात आली आहे अशी माहिती तपास यंत्रणांनी दिली आहे.

मोहंमद युनूस महंमद याकू साकी (वय 24) आणि मोहंमद इम्रान महंमद युसूफ खान (वय 23, दोघे सध्या रा. चेतना गार्डन, मीठानगर, कोंढवा) अशी एटीएस कोठडी देण्यात आलेल्या दहशतवाद्यांची नावे आहेत. सदर दहशतवाद्यांची पोलिस कोठडी संपत असल्याने दहशतवाद विरोधी पथकाने दोघांना जिल्हा व सत्र न्यायालयात मंगळवारी हजर केले. त्यावेळी सत्र न्यायाधीश एस. व्ही. कचरे यांच्या न्यायालयाने त्यांना पाच ऑगस्टपर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे.

दहशतवाद विरोधी पथकाने तपासा दरम्यान दोन्ही आरोपींच्या घराची झडती घेतली त्यामध्ये विविध वस्तू आढळून आल्या. त्यात लॅपटॉप ,पेन ड्राईव्ह, संगणक ,मोबाईल, सिम कार्ड अशा विविध इलेक्ट्रॉनिक उपकरणांसह पांढरी पावडर सापडली होती. ती पावडर स्फोटकच असल्याचे एक्स्प्लोसिव्ह वेफर डिटेक्टर मध्ये स्पष्ट झाले आहे. तसेच पोलिसांच्या डॉग स्कॉडने देखील यासंबंधी पॉझिटिव्ह रिपोर्ट दिला आहे. ही पावडर नेमके कोणते स्फोटके आहे, त्यासाठी न्यायवैद्यक प्रयोगशाळेकडे तपासणीसाठी पाठविला असून त्याचा अहवाल येणे बाकी आहे. इतर इलेक्ट्रॉनिक उपकरणांमध्ये नेमकी कोणती माहिती आहे याबाबतचे तपासणी फॉरेन्सिक आहवालाद्वारे करण्यात येत आहे अशी माहिती तपास अधिकारी यांनी न्यायालयात दिली आहे.

# मोशीत क्रिकेट स्टेडियमसह आंतरराष्ट्रीय बहुउद्देशीय क्रीडा संकुल!

## पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासनातर्फे लेखाशिर्षामध्ये बदल

### आमदार महेश लांडगे यांच्या सुचनेची आयुक्तांकडून अंमलबजावणी

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मोशी येथील क्रिकेट स्टेडिअमसह आता आंतरराष्ट्रीय बहुउद्देशीय क्रीडा संकुल उभारण्यात येणार आहे. त्यासाठी महापालिका प्रशासनाने लेखाशीर्षात बदल केला आहे. भाजपा आमदार तथा शिरूर लोकसभा निवडणूक प्रमुख महेश लांडगे यांनी याबाबत महापालिका प्रशासनाकडे पत्रव्यवहार केला होता. यावर आयुक्त शेखर सिंह यांनी अंमलबजावणी केली असून, महासभेमध्ये संबंधित प्रस्तावाला मंगळवारी मंजुरी देण्यात आली.**

पिंपरी-चिंचवड शहराची ओळख ‘औद्योगिक नगरी’, ‘कामगारनगरी ’ अशी आहे. भविष्यकाळात ‘स्पोर्ट्स सिटी’ म्हणून शहराचा लौकीक व्हावा. या हेतूने महत्त्वाकांक्षी प्रकल्प हाती घेण्यात आले आहेत.

‘भोसरी व्हीजन- २०२०’ अभियानांतर्गत स्केटिंग ग्राउंड, बॅडमिंटन कोर्ट, भोसरी मल्टीपर्पज स्पोर्ट्स गॅलरी, मल्टीपर्पज स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स, आतरराष्ट्रीय दर्जाचे कुस्तीकेंद्र, बास्केटबॉल मैदान, टेनिस कोर्ट आणि हॉलीबॉल, जलतरण तलाव, प्ले ग्राउंड आदी प्रकल्प प्रगतीपथावर आहेत. तसेच, २०१९ पासून मोशी येथे आंतरराष्ट्रीय दर्जाचे क्रिकेट स्टेडिअम उभारण्यात येत आहे. प्रशासनाने स्टेडिअमच्या



कामासाठी ४०० कोटी रुपयांचा खर्च आणि लेखाशिर्षाला मंजुरी दिली आहे. ही बाब स्वागतार्ह असली तरी, शहरामध्ये ‘चऱ्होली-चिखली-मोशी हा रेसिडेन्सिअल कॉरिडॉर’ मोठ्या प्रमाणात विकसित होत आहे. शहरात विकासाच्या सर्वाधिक संधी असलेला हा परिसर नावारुपाला येत आहे. त्या अनुशंगाने या परिसरात निर्माण होणाऱ्या आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडिअमला वर्षभरातील आठ ते दहा महिने प्रेक्षकांची गर्दी होण्यासाठी हा प्रकल्प केवळ स्टेडिअम म्हणून नव्हे, तर सर्वप्रकारच्या खेळांसाठी आंतरराष्ट्रीय दर्जाचे बहुउद्देशीय क्रीडा संकुल म्हणून विकसित करावे, अशी सूचना आमदार महेश लांडगे यांनी केली होती.

> मोशी आरक्षण क्रमांक १/२०४ येथे क्रिकेट स्टेडियमसह बहुउद्देशीय क्रीडा संकुल निर्मिती झाल्यास या मैदानावर प्रेक्षकांची वर्षातील किमान सात ते आठ महिने गर्दी राहणार आहे. प्रेक्षकसंख्या वाढल्यास स्थानिक तरुणांना रोजगाराच्या विविध संधी निर्माण होतील, अशी अपेक्षा आहे. तसेच, महापालिका प्रशासनाच्या महसुलातही भर पडणार आहे. त्यामुळे लेखाशीर्ष व्यापक करून क्रिकेट स्टेडियम आणि बहुउद्देशीय क्रीडा संकुल विकसित करावे, अशी सूचना केली होती त्याला प्रशासनाने सकारात्मक प्रतिसाद दिला.
>
> **– महेश लांडगे,**
>
> आमदार भोसरी विधानसभा. निवडणूक प्रमुख, शिरूर लोकसभा.

तसेच, यासंदर्भात लेखाशिर्षामध्ये बदल करावा व बालेवाडी येथील छत्रपती शिवाजी महाराज क्रीडा संकूलाच्या धर्तीवर “आंतरराष्ट्रीय बहुउद्देशीय क्रीडा संकूल” विकसित करण्यासाठी व्यापक लेखाशिर्ष करावे.

ज्यामुळे पिंपरी-चिंचवडमधील खेळाडूंना राज्य, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये कामगिरी करण्यासाठी हक्काचे व्यासपीठ उपलब्ध होईल, अशी मागणी करण्यात आली होती. आता नगरसचिव विभागाच्या मान्यतेने बहुउद्देशीय क्रीडा संकुलाच्या कामाला गती मिळणार आहे.

---

# डासोत्पत्ती ठिकाणांची शोधमोहीम तीव्र करा

## डासोत्पत्तीचे ठिकाण आढळून आल्यास कडक कारवाई

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**शहरातील डासोत्पत्ती ठिकाणांची शोधमोहीम तीव्र करून डेंग्यू आजार नियंत्रित करण्यासाठी महापालिकेची यंत्रणा पुर्ण क्षमतेने कार्यान्वित करा. वारंवार सूचना देऊनही डासोत्पत्ती ठिकाणे नष्ट करण्याकडे दुर्लक्ष करणा-या आस्थापना, बांधकाम साईट, गृह सोसायट्या, दुकाने आणि घरांची तपासणी करून अशी ठिकाणे आढळून आल्यास त्यांच्यावर कडक कारवाई करा, असे आदेश आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी महापालिका प्रशासनाला दिले आहेत.**

डेंग्यूचा प्रादुर्भाव रोखण्याच्या दृष्टीने केलेल्या आणि करावयाच्या उपाय योजने बाबत महानगरपालिकेच्या पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये आयुक्त सिंह यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक घेण्यात आली. या बैठकीत डेंग्यू नियंत्रण मोहीम आणि उपाय योजनेची माहिती त्यांनी घेतली. या आजाराचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी विविध सूचना आयुक्त शेखर सिंह यांनी संबंधितांना दिल्या, यावेळी ते बोलत होते.

बैठकीस अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, वायसीएमचे अधिष्ठाता डॉ. राजेंद्र वाबळे, आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे, अतिरिक्त आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. अभयचंद्र दादेवार, सहाय्यक आयुक्त यशवंत डांगे,



विशेष अधिकारी किरण गायकवाड, क्षेत्रीय अधिकारी सुचिता पानसरे, अमित पंडित, आण्णा बोदडे, किरण मोरे, राजेश आगळे, सिताराम बहुरे, शितल वाकडे, उमेश ढाकणे आदींसह सहाय्यक आरोग्य अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते. डेंग्यू नियंत्रणासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविणे आवश्यक असून डासांची उत्पत्ती होणारी स्थळे प्राधान्याने नष्ट करा. अधिक पथके नेमून डासोत्पत्ती ठिकाणे नष्ट करून डासोत्पत्ती करणाऱ्या ठिकाणांवर दंडात्मक कारवाई करण्याची मोहीम अधिक तीव्र करा. पथकांमध्ये आवश्यक मनुष्यबळ वाढवून शहरातील औद्योगिक, बांधकाम आस्थापना,

> डोळे येण्याच्या आजारामध्ये डोळ्यांच्या पापण्या चिटकणे, सतत डोळ्यांची जळजळ होणे, डोळ्यातून पाणी येणे, डोळ्यातून घाण येणे अशी लक्षणे आढळली आहेत. पिंपरी चिंचवड शहरात अद्याप डोळे येण्याची साथ पसरली नसली तरी वैद्यकीय विभागाने इतर विभागांशी समन्वय साधून आवश्यक ती खबरदारी घेतली आहे. आजाराचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी वैद्यकीय यंत्रणा सज्ज ठेवली असून हा आजार संसर्गजन्य असल्याने नागरिकांनी नियमांचे पालन करून दक्षता घ्यावी.
>
> **– डॉ. लक्ष्मण गोफणे,**
>
> आरोग्य वैद्यकीय अधिकारी

कार्यालये, गृहसंस्था, घरे तसेच व्यावसायिक दुकानांसह विविध भागांची नियमितपणे तपासणी करा. जनजागृती करण्यासाठी विशेष मोहीम राबवावी. गृहनिर्माण सोसायट्यांच्या प्रतिनिधींसमवेत प्रभाग स्तरावर बैठक घेऊन डेंग्यू आजाराचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी कशाप्रकारे काळजी घ्यावी याबाबत माहिती द्यावी अशा सूचना आयुक्त शेखर सिंह यांनी महापालिका प्रशासनाला दिले आहेत. शहरालगतच्या आळंदी, चऱ्होली खुर्द आणि केडगाव अशा काही गावांमध्ये डोळे येण्याची साथ पसरली आहे.

# पूरनियंत्रणासाठी धरणे हाच पर्याय!




**पावसाळा आला की देशात अनेक ठिकाणी पूर येतोच. साधारण ३३.५ दशलक्ष हेक्टर क्षेत्र पूरप्रवण आहे आणि कोणत्याही वर्षांतील कोणत्या तरी ७.५ दशलक्ष हेक्टर क्षेत्रात पूर येतो. पुरामागची कारणे आणि उपाय, यांबाबत अनेक गैरसमज आहेत. त्यांचे निवारण केले जाणे गरजेचे आहे.**

मनुष्यवस्तीच्या (शहर, गाव) वरच्या बाजूला जे नदीचे जलग्रहण क्षेत्र असते तिथे खूप पाऊस पडल्यामुळे नदीचा प्रवाह वाढतो आणि पाणी नदीच्या पात्रातून ओसंडून वस्तीत शिरते. या प्रक्रियेला पूर म्हणतात. आणि पाऊस दूर कुठे तरी वरच्या बाजूला नाही, तर वस्तीतच पडतो, पण हे पावसाचे पाणी वेळेत नदीपर्यंत पोहोचून त्याचा निचरा होत नाही, यामुळे वस्ती जलमय होते त्याला इंग्रजीत 'ड्रेनेज कंजेशन' म्हणतात. मराठीत आपण त्याला 'निचरा खोळंबा' असे म्हणू शकतो. कृष्णा नदीचे पाणी सांगली शहरात शिरते, तो पूर. आणि २००५ साली मुंबईत जे घडले, तो 'निचरा खोळंबा'. या दोन भिन्न प्रक्रिया आहेत आणि म्हणून त्यांच्यावरचे उपायही वेगवेगळे आहेत. आधी 'निचरा खोळंबा' या प्रक्रियेकडे पाहू. शहरातील बांधकामांमुळे पावसाच्या पाण्याच्या प्रवाहाला अडथळा होतो. या पाण्याच्या निचऱ्याकरिता पावसाळी गटारांचे (स्टॉर्म वॉटर ड्रेन्स)



नियोजन करावे लागते. अनेकदा ही गटारे पुरेशी नसतात व जी असतात तीसुद्धा कचऱ्यामुळे बंद होतात आणि मग निचरा खोळंबा होऊन शहर जलमय होते. तर हे नियोजन अधिक चांगले असले पाहिजे आणि पावसाळय़ाआधी गटारांतील घनकचरा काढून ती मोकळी केली पाहिजेत.

पण हेही लक्षात घेणे गरजेचे आहे की २४ तासांत किती पावासाच्या निचऱ्याचे नियोजन होऊ शकते यालाही व्यावहारिक मर्यादा असतात. २००५ साली मुंबईत २४ तासांत ९४४ मिमी पाऊस पडला. ही अनेक दशकांतून एकदा घडणारी घटना आहे. मुंबईत अजिबात पाणी साचू न देता एवढय़ा पाण्याच्या निचऱ्याकरिता जेवढी मोठी गटारे बांधावी लागतील, जेवढा खर्च येईल, तो लक्षात घेता असे करणे व्यवहार्य नाही.

यावर 'मग काय लोकांना बुडू द्यायचे?' असे प्रश्न विचारले जातील. हा मुद्दा एक उदाहरण देऊन स्पष्ट करता येईल- २०२२ साली सायरस मिस्त्री या मोठय़ा उद्योगपतींची कार ताशी ८९ किमी इतक्या वेगाने दुभाजकावर आदळली व त्या अपघातात त्यांचे निधन झाले. या वेगाने अपघात झाल्यावरसुद्धा जीव वाचेल, अशी कार बनवता येईल का? नक्कीच बनवता येईल. १ मिमी जाड पत्र्याऐवजी रणगाडय़ात वापरतात तशी ३०० मिमी जाड प्लेट वापरली तर वाहन ताशी ८९ किमी इतक्या वेगात असतानाही अपघात झाल्यास इजा होणार नाही. पण कोणी तसे करत नाही. कारण रोजच्या वापराची कार रणगाडासदृश बनविणे व्यवहार्य नाही. अभियांत्रिकी नियोजनात एकीकडे वाढीव सुरक्षा आणि दुसरीकडे व्यवहार्यता यांच्यात समतोल साधावाच लागतो.

आता पूर प्रक्रियेचा आढावा घेऊ. धरणे बांधून पुराचे पाणी जलाशयात साठवणे आणि पूर ओसरला की ते साठवलेले पाणी हळूहळू सोडून परत पुढचा पूर साठवून घेण्याकरिता जलाशयात जागा रिकामी करणे हा पूरनियंत्रणाचा सगळय़ात खात्रीचा व दीर्घकाळ टिकणारा उपाय आहे.

भारतात अशा प्रकारे यशस्वी पूरनियंत्रणाची अनेक उदाहरणे आहेत. महानदीमुळे ओडिशात कटक या शहरात वारंवार मोठा पूर येत असे. ओडिशाची राजधानी कटक येथून भुवनेश्वरला नेण्यामागे कटक शहरात वारंवार पुराचे थैमान हे एक कारण होते. पूरनियंत्रणाकरिता केंद्र सरकारने महानदीवर हिराकूड हे धरण बांधले. १९५७ साली धरण पूर्ण झाले आणि कटक शहर पूरमुक्त झाले.

दामोदर नदीच्या खोऱ्यात पुराचा प्रश्न इतका तीव्र हो ता की दामोदर नदीला 'भारताची शोकाची नदी' (इंडियाज रिव्हर ऑफ सॉरो) असे म्हणत. दामोदर नदीवरील मैथोन, पानचेत (पानशेत नव्हे), कोलार आणि तिलइय्या या चार धरणांनी पूरप्रश्न कायमचा निकाली लावला. पुणे शहरातही आता पानशेत, वरसगाव इत्यादी धरणांमुळे पूर येत नाही.पण धरणे बांधण्यासाठी वेळ लागतो, खर्चही बराच येतो. धरण बांधण्यास उपयुक्त अशा जागा फारशा नसतात आणि हल्ली धरणांना पर्यावरणासाठी घातक म्हणून विरोधही होतो. दुसरा पर्याय म्हणजे नदीच्या दोन्ही काठांवर प्रवाहाला समांतर तटबंध (फ्लड एम्बँकमेन्ट्स) बांधून पाण्याला वस्तीत शिरण्यापासून थांबवायचे. याचे काही तोटेही आहेत.

## संपादकीय »

### गती की गत?

***गुजरातसाठी महत्त्वाचे शहर असलेल्या अहमदाबादमधील विमानतळावर गुडघाभर पाणी साठले आणि त्याचे रूपांतर तळय़ात झाले. या सर्व पायाभूत सोयीसुविधांचे उद्‌घाटन मोठय़ा डामडौलात झाले आणि त्याच्या अत्याधुनिकतेचे, अभूतपूर्वतेचे गोडवे सामुदायिकरीत्या गायले गेले...***

या अलीकडच्या काही घटना. गुजरातसाठी महत्त्वाचे शहर असलेल्या अहमदाबादमधील विमानतळावर गुडघाभर पाणी साठले आणि त्याचे रूपांतर तळय़ात झाले. या विमानतळास पोलादी पुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांचे नाव देण्यात आले आहे. परंतु तो उभारताना शास्त्रशुद्ध विचार झाल्याचे दिसत नाही. सरदार पटेलांप्रमाणे सावरकरही विद्यमान सरकारांस प्राणप्रिय. पण त्यांच्याही नावे उभारण्यात आलेल्या विमानतळाचे हे असे झाले.उत्तरेतील हिमालयाच्या पायथ्याशी बारमाही म्हणून गणल्या गेलेल्या 'अटल' बोगद्यास जोडणाऱ्या महामार्गाने पहिल्याच पावसात हाय खाल्ली. याचे अटल नाव अर्थातच भाजपचे सर्वास वंदनीय पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या स्मरणार्थ देण्यात आले.

**काँग्रेसला उतरती कळा लागली होती आणि भाजपकडे स्वबळावर केंद्रात सत्ता स्थापन करण्याची क्षमता नव्हती, तेव्हा राष्ट्रीय लोकशाही आघाडी (एनडीए) अस्तित्वात आली होती. माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी 'एनडीए'चे वादातीत नेते होते; पण वाजपेयींना स्वबळावर सत्ता स्थापन करण्याची आणि ती राबवण्याची संधी मिळाली नाही. पंचवीस वर्षांनंतर केंद्रात भाजपची एकहाती सत्ता आहे आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी तिचे अनभिषिक्त सम्राट आहेत.**

# भाजपला छोटे पक्ष का हवेत?

२०१९ च्या लोकसभा निवडणुकीत भाजपला ३०३ जागा मिळाल्या होत्या. लोकसभेत बहुमतासाठी आवश्यक २७५ संख्याबळापेक्षा २८ जागा भाजपकडे जास्त होत्या. केंद्रामध्ये सत्तेत राहण्यासाठी भाजपला 'एनडीए'तील घटक पक्षांची गरज उरली नव्हती. मतभेदामुळे शिवसेना व शिरोमणी अकाली दल हे 'एनडीए'चे संस्थापक पक्षही बाहेर पडले. मोदींचे नेतृत्व इतके प्रभावशाली की, 'एनडीए' झाकोळलीच. कर्नाटक विधानसभा निवडणुकीत भाजपचा पराभव होईपर्यंत 'एनडीए'ची भाजपला खरोखर गरज भासेल असे वाटले नव्हते. त्यानंतर भाजपने 'एनडीए'चे गुणगान सुरू केले. आता भाजप विरुद्ध विरोधक नव्हे तर, 'एनडीए' विरुद्ध 'इंडिया' (विरोधकांची महाआघाडी) अशी लढाई २०२४च्या लोकसभा निवडणुकीत होणार आहे. दिल्लीत सहा दिवसांपूर्वी भाजपने 'एनडीए'च्या जुन्या व नव्या ३८ घटक पक्षांच्या नेत्यांची बैठक बोलावली होती.



पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या उपस्थितीत २०२४च्या लोकसभा निवडणुकीत 'एनडीए'ला बहुमत मिळवून देण्याचा निर्धार सर्व नेत्यांनी केला. वास्तविक, बैठकीत सहभागी झालेल्या निम्म्याहून अधिक पक्षांकडे एकसुद्धा खासदार निवडून आणण्याची क्षमता नाही. मग भाजप नगण्य वाटणाऱ्या छोटय़ा छोटय़ा प्रादेशिक पक्षांना महत्त्व का देत आहे? भाजपने जमवलेल्या गोतावळय़ात भाजपचे संख्याबळ ३०३, मग दुसऱ्या क्रमांकावर शिवसेना-शिंदे गटाचे १३ खासदार, चिराग पासवान व पशुपती पारस हे दोन्ही गट मिळून लोकजनशक्ती पक्षाचे ६ खासदार, अनुप्रिया पटेल यांच्या अपना दल (सोनेलाल) गटाचे लोकसभेत २ खासदार. राष्ट्रवादी काँग्रेसच्या फुटीर अजित पवार गटाकडे लोकसभेत सुनील तटकरे हे एकमेव खासदार. उर्वरित ७ पक्षांकडे प्रत्येकी एक खासदार आहे. बाकी १६ पक्षांनी २०१९ मध्ये लोकसभेची निवडणूक लढवलीच नव्हती, तर नऊ पक्षांना एकही जागा जिंकता आली नव्हती. आत्ताच्या घडीला भाजपप्रणीत 'एनडीए'मधील २५ पक्षांचे लोकसभेत अस्तित्व नाही. बिहारमधील 'हिंदूस्थान आवामी मोर्चा'चे प्रमुख जीतनराम मांझी हे नितीशकुमार यांचे अनुयायी, त्यांनी मांझींना अल्पकाळासाठी का होईना बिहारचे मुख्यमंत्री केले. आता सत्तेची गणिते लक्षात घेऊन मांझी 'एनडीए'मध्ये आलेले आहेत. बिहारमधून मुकेश सहानी यांचा 'व्हीआयपी', संजय निषाद यांचा निषाद पक्ष, उत्तर प्रदेशात समाजवादी पक्षाशी युती तोडून सुहेलदेव भारतीय समाज पक्षाचे ओमप्रकाश राजभर हेही आले. आंध्र प्रदेशातील पवन कल्याण यांची जनसेनाही 'एनडीए'मध्ये आली.

## ।। अभंगवाणी ।।



न देखें न बोलें नाइकें आणीक ।
बैसला हा एक हरि चित्तीं ॥१॥

सासुरें माहेर मज नाहीं कोणी ।
एक केलें दोन्ही मिळोनियां ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# 16 आमदार अपात्रता याचिका

## » विधानसभा अध्यक्षांना सुप्रीम कोर्टाने दिली नोटीस

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**शिवसेनेच्या ठाकरे गटाने सुप्रीम कोर्टात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह 16 आमदारांच्या अपात्रतेची याचिका दाखल केलेली. सुप्रीम कोर्टाने या प्रकरणाचा निर्णय घेण्याचा अधिकार विधानसभा अध्यक्षांना दिलेला आहे. त्यानंतर विधानसभा अध्यक्ष ठोस निर्णय घेत नाही, म्हणून पुन्हा ठाकरे गट सुप्रीम कोर्टात गेले होते.**

त्यावेळी विधानसभा अध्यक्षांना अपात्रते प्रकरणात काय केले, असा सवाल करत 27 जुलै ला उत्तर दाखल करा अशी नोटीस न्यायालयाने केली होती. परंतू अद्यापही यासंदर्भात कोणतेही उत्तर विधानसभा अध्यक्षांनी दिलेले नाही.

अवघे दोन दिवस त्यांच्याकडे उरले आहेत. विधासभा अध्यक्षांकडून या प्रकरणात पाहिजे तशी कारवाई केली जात नाही, असा आरोप ठाकरे गटाकडून करण्यात आला त्यानंतर सुप्रीम कोर्टाने विधानसभा अध्यक्षांना 16 आमदारांच्या अपात्रतेच्या मुद्द्यावर लवकरात लवकर निर्णय घेण्यात यावा, असा आदेश दिला होता. पण दोन महिने झाले तरी विधानसभा अध्यक्षांकडून कारवाई करण्यात आली नव्हती.

विधानसभा अध्यक्षांकडून दोन्ही बाजूच्या भूमिका ऐकून घेतल्यानंतर निर्णय घेऊ, असे सांगण्यात येत होते. या सगळ्या घडामोडींदरम्यान ठाकरे गट आक्रमक झाला. ठाकरे गटाचे नेते सुनील प्रभू यांनी सुप्रीम कोर्टाचं दार ठोठावलं. सुप्रीम कोर्टाने निर्देश देवून दोन आठवडे झाल्यानंतरही विधानसभा अध्यक्षांकडून कोणतीही कारवाई करण्यात आली नाही. याउलट आम्ही तीनवेळा कारवाईबाबत निवेदन केले. पण विधानसभा अध्यक्षांकडून दखल घेतली जात नाही. विधानसभा अध्यक्षांनी लवकरात लवकर याप्रकरणी कारवाई करावी, अशी मागणी सुनील प्रभू यांनी याचिकेत केली होती. त्यानंतर एक महत्त्वाची बातमी समोर आली. काही दिवसांपूर्वी विधानसभा अध्यक्षांनी शिवसेनेच्या दोन्ही गटाच्या आमदारांना आपली भूमिका मांडण्यासाठी नोटीस पाठवण्यात आली होती. विधानसभा अध्यक्षांच्या नोटीसनंतर ठाकरे गटाकडून उत्तर सादर करण्यात आलं होतं. पण शिंदे गटाच्या आमदारांनी विधानसभा अध्यक्षांच्या नोटीसला उत्तर देण्यासाठी आणखी मुदत मागितली आहे. त्यामुळे आता 16 आमदारांच्या अपात्रतेची सुनावणी आणखी पुढे ढकलली जाणार असल्याचे संकेत मिळत आहेत. दरम्यान, सुप्रीम कोर्टाने विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांना 16 आमदारांच्या अपात्र प्रकरणात नेमकी काय कारवाई केली? ते सुप्रीम कोर्टात सादर करा, अशी नोटीस पाठवली. या नोटीससाठी दोन आठवड्यांचा कालावधी देण्यात आला होता. हा कालावधी संपायला आता दोनच दिवस शिल्लक राहिले आहेत. असं असताना विधीमंडळाकडून सुप्रीम कोर्टात अद्याप कोणतेही उत्तर दाखल करण्यात आलेलं नाही, अशी माहिती समोर येत आहे.



### कायदेशीर बाबींची तपासणी सुरु

» कोर्टाच्या निर्देशानंतर विधीमंडळाकडून कायदेशीर बाबींची तपासणी सुरु होणार आहे. कोर्टाने दोन आठवड्यात उत्तर सादर करण्याचे आदेश दिले आहेत. पण दोन दिवसांत सुप्रीम कोर्टाची मुदत संपणार आहे. विधीमंडळाकडून सुप्रीम कोर्टात उत्तर गेलेले नाही. विधीमंडळाकडून सगळ्या कायदेशीर बाबी तपासल्या जातील. त्यानंतर या दोन दिवसांत सुप्रीम कोर्टात उत्तर सादर केले जाईल, असे सुत्रांकडून सांगितले जात आहे.

---

# निधीवाटपात सावत्र वागणूक ?

## » अजिबात सावत्र वागणूक देत नाही : पवार

। मुंबई ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**अधिवेशनात सुरू असलेल्या चर्चेच्या दरम्यान, निधीवाटपावरून विरोधकांकडून उपमुख्यमंत्री अजित पवार यांना चांगलेच धारेवर धरले. तर दुजाभाव केला जात असल्याचा आरोप करत विरोधकांकडून सभागृहात गोंधळ घालण्यात आला. आमदार यशोमती ठाकूर म्हणाल्या की, आम्हाला सावत्र वागणूक दिली जात आहे. निधीवाटपात सावत्र वागणूक का देता? असा सवाल त्यांनी अजित पवार यांना विचारला.**

तेव्हा उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, मी अजिबात सावत्र वागणूक देत नाही. यशोमती ताई तुम्ही चष्मा बदला, मी तुम्हाला भावाच्या नात्याने ओवाळणी देईल, असे म्हणत उत्तर दिले. त्यानंतर देखील सभागृहातील गोंधळ काही थांबला नाही. कॉंग्रेस आमदारांकडून जोरदार विरोध केला गेला. त्यावर अजित पवार म्हणाले की, वर्षा गायकवाड, यशोमती ठाकूर, नाना पटोले यांचे काही मतं असू शकता. कारण ते देखील चार ते पाच लाख लोकांचे प्रतिनिधीत्व करत आहेत. हे बोलत असताना पुन्हा विरोधकांडून सभागृहात जोरदार विरोध करत घोषणाबाजी केली. त्यावर उपमुख्यमंत्री अजित पवारांना देखील विरोधक बोलू देत नव्हते. त्यामुळे सभागृहात चांगलेच वातारवण तापलेले पाहायला मिळाले. त्यानंतर विरोधकांकडून सभागृहाचा त्याग करण्यात आला. अजित पवार म्हणाले की, साधारण सभागृहाच्या भावना मुख्यमंत्र्यांना माहित असतात. विरोधी पक्षाच्या नेत्यांनी जी भूमिका मांडली त्यावर सकारात्मक भूमिका घेतली जाईल. सन 2023 -2024 या मधील 41,243 कोटी 20 लाख एकत्रित मागणी पुरवणी मागणीला मंजुरी द्यावी, अशी अजित पवार यांनी केली. त्यानंतर विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी विविध नियमांचे वाचन करून अधिनियमांचा उल्लेख करत मागण्यांना मंजुरी दिली.



### आम्ही काय पाप केले : नाना पटोले

» निधीवाटप करताना सुरू असलेला दुजाभाव किती धक्कादायक आहे. आम्ही लोकप्रतिनिधी नाही का, आमच्यावर दुजाभाव का केला जातो, आम्ही काही पापं केले आहे का, असा सवाल करत कॉंग्रेसनेते नाना पटोले आक्रमक झाले. त्यानंतर त्यांनी सभागृहाचा त्याग केला. त्यांच्यासोबत कॉंग्रेस नेते देखील उपस्थित होते.

---

# विधानसभा पानाची टपरी वाटते का?

। मुंबई ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाच्या आधी चर्चेत असलेले मंत्री अब्दुल सत्तार आता पुन्हा एकदा अधिवेशनादरम्यान चर्चेत आले आहेत. या वेळी मात्र, त्यांनी चक्क विधान परिषदेच्या सभागृहातच थेट पुडी काढून तोंडात टाकली. त्यामुळे महाराष्ट्र कॉंग्रेसने त्यांच्यावर सडकून टीका केली आहे. शिंदे-फडणवीस सरकारच्या आमदारांना विधानसभा पानाची टपरी वाटते का? असा खडा सवाल महाराष्ट्र कॉंग्रेसने उपस्थित केला आहे.

या संदर्भातला व्हिडिओ महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस कमिटीच्या वतीने सोशल मीडिया द्वारे पोस्ट करण्यात आला आहे. या व्हिडिओ मध्ये महाराष्ट्र कॉंग्रेसने सत्तार यांचे नाव न घेता थेट शिंदे फडणवीस सरकारवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. विशेष म्हणजे सत्तार ज्यावेळी पुडी खाताना दिसतात त्यावेळी मंत्री शंभूराज देसाई हे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अभिनंदनचा प्रस्ताव सभागृहात मांडत आहे. विधानसभेत चर्चा सुरू असताना सत्तार महोदयांनी थेट पुडी काढून तोंडात टाकली आणि निर्धास्तपणे चघळत बसले. आज विधानसभेत पुडी खाऊन चगळतायत उद्या तिथे थुंकायलाही कमी करणार नाहीत. शिंदे-फडणवीस सरकारच्या आमदारांना विधानसभा पानाची टपरी वाटते का?



# 'इंडिया' नावावर मोदींचे टिकास्त्र

## » इंडियन मुजाहिद्दीन आणि पीएफआयशी केली तुलना

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**मणिपूर हिंसाचारावर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी निवेदन करावे, अशी मागणी विरोधकांनी पावसाळी अधिवेशनात लावून धरली आहे. मात्र अद्याप पंतप्रधानांनी यावर भूमिका जाहीर केलेली नाही. त्यातच त्यांनी मंगळवारी (दि. २५ जुलै) विरोधकांच्या 'इंडिया' आघाडीवर जोरदार टीका केली. .**

ते म्हणाले, ब्रिटिशांच्या ईस्ट इंडिया कंपनीपासून ते इंडियन मुजाहिद्दीन, पॉप्युलर फ्रंट ऑफ इंडिया (PFI) अशा दहशतवादी संघटनांपर्यंत अनेकांनी आपल्या नावात 'इंडिया' हा शब्द ठेवला आहे. मोदी यांनी पहिल्यांदाच पावसाळी अधिवेशनादरम्यान खासदारांची बैठक घेतली. केंद्र सरकारमध्ये तिसऱ्यांदा सरकार स्थापन करण्यासाठी पक्षाने तयार राहावे आणि त्या अनुषंगाने तयारी सुरू करावी, असेही आवाहन त्यांनी केले. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, पंतप्रधान नरेंद्र मोदी या बैठकीत म्हणाले, विरोधकांनी लोकांची दिशाभूल करण्यासाठी 'इंडिया' हे नाव धारण केले आहे. 'इंडिया' हे नाव वगळता बाकी त्या आघाडीत काहीही नाही. तसेच 'इंडिया' या नावावरून मोदी यांनी त्याचा संदर्भ ईस्ट इंडिया कंपनी आणि दहशतवादी संघटनांशी लावला. बैठकीला उपस्थित असणाऱ्या एका खासदारांनी द इंडियन एक्स्प्रेसला मोदी काय म्हणाले? याची माहिती दिली.



पंतप्रधान म्हणाले, "इंडिया कंपनी, इंडियन नॅशनल काँग्रेस, इंडियन मुजाहिद्दीन, पॉप्युलर फ्रंट ऑफ इंडिया या सर्व नावामध्येही 'इंडिया' आलेले आहे.

पंतप्रधान मोदी खासदारांच्या बैठकीत सांगितले की, विरोधकांच्या नेत्यांना कळले आहे की, पुढच्या लोकसभा निवडणुकीतही त्यांना विरोधात बसावे लागणार आहे, त्यामुळे ते सैरभैर झाले आहेत, अशी माहिती माजी केंद्रीय मंत्री रविशंकर प्रसाद यांनी दिली.

"मी यापूर्वी कधीही असे दिशाहीन विरोधक पाहिलेले नाहीत. भाजपाच्या खासदारांनी विरोधकांच्या आंदोलनामुळे निराश किंवा विचलित होऊ नये. विरोधकांचे कामच विरोध करणे आहे. यापेक्षा सरकारच्या योजनांचे लाभ सर्वदूर पोहोचत आहे की नाही, यावर लक्ष ठेवावे", असेही पंतप्रधान मोदी यावेळी म्हणाले. आणखी एका सूत्राने दिलेल्या माहितीनुसार, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या बैठकीत मणिपूरबाबत कोणताही उल्लेख केला नाही.

खासदारांना संबोधित करत असताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आठवण करून दिली की, जगभरातील मोठे देश भारतातील विद्यमान नेतृत्वावर विश्वास ठेवत आहेत. त्यासाठीच अमेरिका आणि फ्रान्ससारख्या देशांनी आपल्यासोबत करार केले. सरकारच्या तिसऱ्या टर्ममध्ये भारत हा जगातील तिसरी मोठी अर्थव्यवस्था होईल, असे काम आपल्याला करायचे आहे, असे पंतप्रधान म्हणाल्याचे सूत्रांनी सांगितले.

### भारताला कमकुवत करण्याचे योजिले

» पंतप्रधान मोदी यांच्या भाषणानंतर भाजपाच्या काही नेत्यांनी भारत आणि इंडिया यातील फरक स्पष्ट करून सांगितला. दहशतवादी आणि नक्षलवादी संघटना आपल्या नावापुढे इंडिया हे नाव लावतात, ही आता फॅशनच झाली आहे. विरोधकांनी सुद्धा इंडिया या नावाचा आधार घेऊन परकीय शक्तींच्या सहाय्याने भारताला कमकुवत करण्याचे योजिले आहे, असे ट्विट भाजपाचे खासदार निशिकांत दुबे यांनी केले.

# रशियात ट्रान्सजेंडर विवाहांवर बंदी

## » संसदेच्या दोन्ही सभागृहांकडून कायदा संमत

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**रशियामध्ये लिंगबदल शस्त्रक्रियांवर बंदी घालणाऱ्या कायद्यावर अध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांनी स्वाक्षरी केली आहे. या कायद्यामुळे आता रशियात कोणतीही व्यक्ती लिंग बदलण्याच्या उद्देशाने कुठल्याही प्रकारची शस्त्रक्रिया करू शकणार नाही. अध्यक्ष पुतिन यांचा हा निर्णय रशियातील एलजीबीटीक्यू+ समुदायासाठी मोठा धक्का असल्याचं मानलं जात आहे. दी गार्डियनच्या रिपोर्टनुसार रशियातील संसदेच्या दोन्ही सभागृहांनी सर्वानुमते हा अधिनियम पारित केला आहे.**



### पुस्तकं आणि लेखांवरही बंदी

रशियात एलजीबीटीचं समर्थन करणाऱ्या पुस्तकांवर, वर्तमानपत्रांमधील लेखांवर, बातम्यांवर पूर्णपणे बंदी घालण्यात आली आहे. २०१३ मध्ये रशियाने अल्पवयीन मुलांमधील अपारंपरिक शारीरिक संबंधांचं सार्वजनिकरित्या समर्थनावर बंदी घातली होती. त्यानंतर २०२० मध्ये सुरक्षित शारीरिक संबंधदेखील अवैध ठरवण्यात आले.

या नव्या कायद्यामुळे आता रशियात कुठलीही व्यक्ती लिंगबदलाची शस्त्रक्रिया करू शकणार नाही. तसेच ज्या जोडप्यांनी लिंग बदलून लग्नं केली आहेत, ती लग्नंदेखील आता रद्द होतील. यासह ट्रान्सजेंडर पालक मुलं दत्तक घेऊ शकणार नाहीत. लिंगबदलाबाबत रशियात आता कडक कायदा केला असला तरी यात एक अपवाद आहे. ज्या मुलांमध्ये लिंगाबाबत जन्मजात विसंगती आढळेल, किंवा ज्या अर्भकांना काही वैद्यकीय उपचारांची गरज असेल अशा प्रकरणांमध्ये शस्त्रक्रियेस परवानगी देण्यात आली आहे. दरम्यान, रशियन सरकारच्या या नव्या कायद्याचा बचाव करताना संसदेने म्हटलं आहे की, कुटुंबांबत पाश्चिमात्य विचारसरणीच्या विरोधात हे रशियाचं योग्य पाऊल आहे. बऱ्याचदा समाजाला अशा प्रकारच्या उपायांना सामोरं जावं लागतं. ही काही त्याची पहिली वेळ नाही. हा कायदा जरी आज पारित झाला असला तरी याची सुरुवात एक दशकापूर्वी झाली होती. दशकभरापूर्वी रशियन पुराणमतवादी चर्चने पारंपरिक कौटुंबिक मुल्यांवर लक्ष केंद्रित करण्याची घोषणा केली होती.

# मणिपूरमध्ये रक्षकच झाला भक्षक !

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

मणिपूरमधील हिंसाचाराच्या वेगवेगळ्या बातम्या येत आहेत. या बातम्या संतप्त करणाऱ्या आहेत. आज मणिपूरमधून आणखी एक चीड आणणारी बातमी समोर आली आहे. सीमा सुरक्षा दलातील (बीएसएफ) एक जवानाला मणिपूरमधील राशनच्या दुकानात स्थानिक महिलेशी छेडछाड केल्याच्या आरोपाखाली निलंबित करण्यात आलं आहे.

बीएसएफच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने याबाबतची माहिती दिली आहे. बीएसएफ जवान स्थानिक महिलेची छेड काढतानाचा व्हिडीओ व्हायरल झाला आहे. या व्हिडीओत हेड कॉन्स्टेबल सतीश प्रसाद बीएसएफच्या गणवेशात दिसतोय. तसेच तो दुकानातील महिलेशी असभ्य वर्तन करत आहे.

बीएसएफच्या अधिकाऱ्याने सांगितलं की ही घटना २० जुलै रोजीची असून इम्फाळ पश्चिम जिल्ह्यात घडली आहे. या घटनेप्रकरणी तक्रार प्राप्त झाल्यावर सीमा सुरक्षा दलाने तपास करून त्याच दिवशी या जवानाला निलंबित केलं आहे.

अधिकाऱ्याने सांगितलं की, बीएसएफच्या १०० व्या बटालियनशी संबंधित हेड कॉन्स्टेबलविरुद्ध न्यायालयीन चौकशीची कार्यवाही सुरू करण्यात आली आहे. अशा प्रकारची कृत्य सहन केली जाणार नाहीत.

याप्रकरणी निष्पक्ष तपास केला जाईल. भारताच्या इशान्येकडील राज्य मणिपूरमध्ये गेल्या तीन महिन्यांपासून हिंसाचार सुरू आहे. गेल्या आठवड्यात मणिपूरमधील एक व्हिडीओ व्हायरल झाला.

# OMG-2 सेन्सॉर बोर्डानं दिलं सर्टिफिकेट'?




बॉलीवूडचा खिलाडी अक्षय कुमारचा ओह माय गॉडचा दुसरा पार्ट हा प्रेक्षकांच्या भेटीला येतो आहे. ऑगस्टच्या दुसऱ्या आठवड्यात हा चित्रपट प्रदर्शित होणार असून त्याची टक्कर गदर २ सोबत होणार आहे. मात्र यासगळ्यात हा चित्रपट आता सेन्सॉर बोर्डाच्या कात्रीत सापडल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे निर्मात्यांची डोकेदुखी वाढली आहे. ओह माय गॉडचा पहिला पार्ट ज्यावेळी प्रदर्शित झाला होता त्यावेळी त्याला प्रेक्षकांचा तुफान प्रतिसाद मिळाला होता. त्यातील संवाद, कलाकारांचा अभिनय, गाणी हे सारं प्रेक्षकांना कमालीचे आवडले होते. बॉक्स ऑफिसवर देखील या चित्रपटानं प्रेक्षकांना जिंकून घेतले होते. त्यानं प्रचंड कमाईही केली होती. आता अशी बातमी समोर आली आहे की, सीबीएफसी अर्थात सेंट्रल बोर्ड ऑफ फिल्म सर्टिफिकेशननं निर्मात्यांना मोठा धक्का दिला आहे.

# सुनील ग्रोव्हर विकतोय मक्याचे कणीस

बॉलिवूड अभिनेता आणि कॉमेडियन सुनील ग्रोव्हर सध्या चर्चेत आहे. गेल्या काही दिवसांपासून तो त्याच्या सोशल मीडिया अकाउंटवर मजेशीर फोटो आणि व्हिडिओ शेअर करत आहे. सुनील कधी चपाती बनवताना, तर कधी रस्त्याच्या कडेला छत्री विकताना दिसतो. अलीकडेच, त्याने एक व्हिडिओ शेअर केला आहे ज्यामध्ये तो एका गाडीवर कणीस भाजताना दिसत आहे. सुनील 3 दिवसांपासून रस्त्याच्या कडेला असलेल्या वेगवेगळ्या दुकानांत काम करताना दिसत आहे. मात्र, सुनील हे जीवनाचा आनंद लुटण्यासाठी करतोय की आणखी काही प्रोजेक्टसाठी, हे येणारा काळच सांगेल. पण हे व्हिडिओ पाहून त्याचे चाहते खूप खूश आहेत. नुकताच सुनीलने त्याच्या इंस्टाग्राम अकाउंटवर एक व्हिडिओ शेअर केला आहे. व्हिडिओमध्ये तो कॉर्नच्या गाड्यावर बसून कणीस भाजताना दिसत आहे. हे शेअर करत त्याने लिहिले, 'पुढील मिशन शोधत आहोत. याशिवाय सुनीलने काही फोटोही शेअर केले आहेत ज्यात तो रस्त्याच्या कडेला छत्री विकताना दिसत आहे. ते शेअर करत अभिनेत्याने लिहिले की, 'एवढ्या पावसात माझी स्वतःची छत्रीही विकली गेली. कोणाला छत्री हवी आहे का?' याआधी अभिनेता एका दुकानात चपाती भाजतानाही दिसला होता.

# बार्बी पहायला गेली जुही

सध्या जागतिक सिनेमांमध्ये बार्बी आणि ओपनहायमर या दोन सिनेमांची कमालीची उत्सुकता आहे. हे दोन्ही सिनेमे बॉक्स ऑफीसवर चांगली कामगिरी करत आहेत. या दोन सिनेमांमध्ये होणारा क्लॅश हा हॉलीवुड सिनेमांमधील आजवरचा मोठा क्लॅश समजला जातोय. या दोन सिनेमांपैकी बार्बी सिनेमा पहायला लहानांपासुन मोठ्यांपर्यंत सर्वजण गर्दी करत आहेत. खेळण्यातली बाहुली बार्बी आता मोठ्या पडद्यावर आल्याने सर्वजण उत्सुक आहेत. अशातच बॉलीवुड अभिनेत्री जुही परमार मात्र बार्बी सिनेमा अर्ध्यावर सोडून उठली. काय झालं नेमकं पाहूया. जुहीने बार्बी सिनेमा पाहून सोशल मिडीयावर लांबलचक पोस्ट लिहीली आहे. जुही लिहीते.. 'मी इथे जे सांगतोय ते ऐकून कदाचित माझ्या फॅन्सना वाईट वाटेल. तुमच्यापैकी काही जण माझ्यावर रागावाल. पण एक काळजी घेणारे पालक म्हणून मला ही नोट शेअर करायची आहे, मला चुकीचे समजू नका. मी केलेली चूक करू नका, मुलाला चित्रपट दाखवण्यापूर्वी तपासून पहा, निवड तुमची आहे. जुही पुढे लिहीते.. 'प्रिय बार्बी, मी माझी चूक मान्य करून सुरुवात करतो. मी माझी 10 वर्षांची मुलगी समायरा हिला तुमचा बार्बी चित्रपट PG-13 चित्रपट असल्याचे संशोधन न करता बघायला नेले (काही दृश्ये 13 वर्षाखालील मुलांसाठी अयोग्य असू शकतात). या चित्रपटात सुरुवातीला 10 मिनिटे आक्षेपार्ह भाषा आणि दृश्ये होती. आणि शेवटी मी माझ्या मुलाला काय दाखवले याचा विचार करून मी अस्वस्थ होऊन थिएटर हॉलमधून बाहेर पडले. तुझा हा चित्रपट पाहण्यासाठी माझी मुलगी कधीपासून वाट पाहत होती. मी माझ्या मुलीला जे काही दाखवले ते पाहून मला धक्का बसला. मी निराश झाले. जूही पुढे म्हणाली, 'मी पहिली व्यक्ती आहे जिने 10/15 मिनीटांनंतरच चित्रपट सोडून तेथून पळ काढला. नंतर काही इतर पालक देखील बाहेर येत होते ज्यांची मुले रडत होती आणि काहींनी बसून संपूर्ण चित्रपट पाहिला.



# किली पॉल सनीच्या गाण्यावर थिरकला

बॉलीवूडच्या प्रेक्षकांना आता उत्सुकता आहे ती सनी देओलच्या गदर २ चित्रपटाची. तब्बल दोन दशकांनंतर या चित्रपटाचा दुसरा भाग प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. त्यात सनी आणि अमिषा एका वेगळ्या रुपात दिसणार आहे. अनिल शर्मा यांचे दिग्दर्शन असलेल्या या चित्रपटातील गाणी, टीझर प्रेक्षकांना कमालीचे आवडले आहेत. भारत आणि पाकिस्तान या विषयावर केंद्रीत असलेल्या गदरचा दुसरा भाग ऑगस्टच्या दुसऱ्या आठवड्यात प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. त्याच्या ट्रेलरनं वेगळ्याच चर्चेला उधाण आले होते. अशातच कपिल शर्माच्या शो मध्ये सनीनं गदर च्या पहिल्या पार्टच्यावेळी आपल्याला बॉलीवूडनं कशाप्रकारे बॉयकॉट केले होते हा अनुभव सांगून प्रेक्षकांना मोठा धक्का दिला होता. खरंतर त्यावेळी सनीचा गदर आणि आमिरचा लगान हे एकाचवेळी प्रदर्शित झाले होते. लगाननं भलेही ऑस्करपर्यंत मजल मारली असेल पण गदरनंही प्रेक्षकांची मनं जिंकली होती. लगानला काही ऑस्कर मिळाला नाही पण त्यानं गदरशी थेट पंगा घेतला होता. त्याचा सनीला राग असल्याचे अजूनही बोलले जाते.

# बाईपण सैराटचा विक्रम मोडणार?

बाईपण भारी देवा सध्या चांगलाच चर्चेत आहे. भर पावसात बाहेर पाण्याने रस्ते तुडूंब भरलेत तर आत बाईपण भारी देवा पाहण्यासाठी थिएटर हाऊसफुल्ल झाले आहेत.
बाईपण भारी देवा पाहायला प्रेक्षकांनी गर्दी केलीय त्यामुळे बाईपण भारी देवा चा कमाईचा आकडा दिवसेंदिवस वाढत जातोय. आता बाईपण भारी देवा सिनेमाचा लेटेस्ट बॉक्स ऑफीस रिपोर्ट पाहून सिनेमा सैराटचा विक्रम मोडणार का? असा प्रश्न सर्वांना पडलाय बाईपण भारी देवा लेटेस्ट बॉक्स ऑफीस रिपोर्ट समोर आलाय. हा रिपोर्ट पाहून बाईपण भारी देवा सैराटचा विक्रम मोडणार अशी चिन्हं दिसत आहेत. बाईपण भारी देवा सिनेमाने आतापर्यंत ६५.६१ कोटींची कमाई केलीय. या कमाईबद्दल बाईपण भारी देवाचे दिग्दर्शक केदार शिंदेंनी भावना व्यक्त केल्या सिद्धिविनायकाचा महाप्रसाद.. मराठी सिनेमाच्या इतिहासात याची नोंद घेतली जाईल. स्त्री घर चालवते तर, सिनेमा तर निश्चितच चालवू शकते. सैराट नंतरचा बाईपण ठरला महाराष्ट्राचा महासिनेमा.. 'बाईपण भारी देवा' या चित्रपटाला फुल टू माउथ पब्लिसीटी मिळत आहे. त्यातच चित्रपटाची कथा, त्याला घातलेली भावनिक साद आणि चित्रपटातील कमाल गाणी यामुळे चित्रपट पाहण्यासाठी प्रेक्षक गर्दी करत

# ड्रीम गर्ल आयुष्मान




बॉलिवूड अभिनेता आयुष्मान खुराना हा त्याच्या 'ड्रीम गर्ल 2' चित्रपटामुळे सध्या चर्चेत आहे . त्याचे चाहते त्याच्या चित्रपटाची आतुरतेने वाट पाहत आहेत. आयुष्मान खुरानाचा हा चित्रपट 25 ऑगस्ट 2023 रोजी थिएटरमध्ये रिलीज होणार आहे. 'ड्रीम गर्ल 2' चित्रपटाच्या रिलीजच्या महिना आधी आज चित्रपटाच्या निर्मात्यांनी आयुष्मान खुरानाच्या या चित्रपटातील फर्स्ट लुक शेअर केला आहे. आयुष्मान खुरानाने याआधीही 'ड्रीम गर्ल 2' चे प्रोमो शेयर केले होते. ज्यामध्ये तो अभिनेत्यांसोबत बोलतांना दिसला होता. त्यात त्याने पठाण म्हणजेच शाहरुख, रणबीर, रणवीर यांच्यासोबत फोनवर गप्पा मारल्या होत्या. मात्र त्याने त्याचा चेहरा दाखवला नव्हता . आता आयुष्मान खुरानाने 'ड्रीम गर्ल 2' या चित्रपटातील त्याचा म्हणजेच पूजाचा फर्स्ट लूक सोशल मीडिया अकाउंटवर शेअर केला आहे. आयुष्मान खुरानाने शेअर केलेल्या चित्रपटाच्या पोस्टरमध्ये तो पूजाच्या भूमिकेत आपल्या हातात लिपस्टिक पकडून आरशात बघताना दिसतोय. मात्र आरशाच्या दुसऱ्या बाजूला आयुष्मान खुराना दिसत आहे. पूजाची झलक शेयर करत आयुष्मानने कॅप्शनमध्ये लिहिले आहे की, 'ही फक्त पहिली झलक आहे. आरशात दिसणाऱ्या वस्तू या खऱ्या दिसण्यापेक्षा सुंदर असतात. आयुष्मानचा 'ड्रीम गर्ल 2' मधील हा फर्स्ट लूक सध्या सोशल मिडियावर व्हायरल झाला आहे. त्याच्या या फोटोवर कमेंट करत आहेत. त्याच्या चित्रपटाची प्रतिक्षा आणखीणच वाढली आहे. या चित्रपटात आयुष्मान खुराना आणि अनन्या पांडेसोबत दिसणार आहेत.

# हरमनप्रीतवर 2 सामन्यांची बंदी!

## » आशियाई क्रीडा स्पर्धेचे 2 सामने खेळता येणार नाही

नवी दिल्ली ।
नवी दिल्ली। वृत्तसंस्था

**भारतीय महिला क्रिकेट संघाची कर्णधार हरमनप्रीत कौरवर 2 सामन्यांची बंदी घालण्यात आली आहे. या बंदीमुळे कौरला आशियाई क्रीडा स्पर्धेतील सुरुवातीचे दोन सामने खेळता येणार नाहीत. बांगलादेशविरुद्धच्या तिसऱ्या एकदिवसीय सामन्यात कौरने बॅट स्टंपला मारली आणि पंचांच्या निर्णयाशी असहमती दर्शवली.**






34 वर्षीय भारतीय कर्णधाराला आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने (ICC) दोन वेगवेगळ्या प्रकरणात शिक्षा ठोठावली आहे. हरमन आयसीसीच्या आचारसंहितेच्या लेव्हल-2 चे उल्लंघन केल्याबद्दल दोषी आढळले आहे, ज्यामुळे तिला त्याच्या मॅच फीच्या 50% दंड ठोठावण्यात आला आहे. यासोबतच 3 डिमेरिट पॉइंटही शिक्षा म्हणून देण्यात आले आहेत. हरमनप्रीत कौरला प्रेझेंटेशन सोहळ्यादरम्यान सामन्यातील अंपायरिंगवर उघडपणे टीका केल्याबद्दल, 'आंतरराष्ट्रीय सामन्यात घडलेल्या घटनेची सार्वजनिक टीका' या लेव्हल-1 उल्लंघनासाठी तिच्या मॅच फीच्या 25 टक्के दंड ठोठावण्यात आला. आशियाई क्रीडा स्पर्धेतील भारतीय संघाचा पहिला सामना 22 सप्टेंबर रोजी होणार आहे. ICC T20 क्रमवारीत टीम इंडिया आशियातील अव्वल संघ आहे. त्यामुळे थेट उपांत्यपूर्व फेरी खेळणार आहे. पाकिस्तान, श्रीलंका आणि बांगलादेश हे टॉप-4 संघांमध्ये आहेत, जे टॉप-8 मधून प्रवेश करतील. 23 सप्टेंबर हा आशियाई क्रीडा स्पर्धेचा पहिला दिवस आहे, या दिवशी कोणतेही क्रिकेट सामने होणार नाहीत. उपांत्यपूर्व फेरीनंतर, 25 सप्टेंबर रोजी 2 उपांत्य फेरी होतील आणि अंतिम सामना 26 सप्टेंबर रोजी होईल. उपांत्य फेरीत पराभूत झालेल्या संघांमध्ये अंतिम फेरीच्या दिवशीच तिसऱ्या क्रमांकाचा सामनाही होईल. महिला गटात एकूण 14 सामने होणार आहेत. याआधी उर्वरित 10 संघ पात्रता फेरी खेळतील. पात्रता फेरीचे 6 सामने 19 ते 21 सप्टेंबर दरम्यान होणार आहेत. 22 आणि 24 सप्टेंबर रोजी 4 उपांत्यपूर्व फेरी होतील. बांगलादेशविरुद्धच्या तिसऱ्या एकदिवसीय सामन्यात एलबीडब्ल्यू आऊट झाल्यानंतर भारतीय कर्णधार हरमनप्रीत कौरने स्टंपला बॅट मारली. पंचांच्या निर्णयाने ती निराश दिसली आणि पॅव्हेलियनमध्ये परतत असताना मैदानावरील पंचांना रागाने काहीतरी बोलतानाही दिसली. ट्रॉफी फोटोशूटमध्ये तिने खेळाडूंसोबत पंच असायला हवेत असेही म्हटले होते. सामना संपल्यानंतरही ती संताप व्यक्त करत म्हणाली, 'अंपायरिंग खूपच खराब होते, आंतरराष्ट्रीय स्तरावर असे निर्णय खूप निराशाजनक दिसतात.'

### काय आहे संपूर्ण प्रकरण

हरमन 34 व्या षटकात बाद झाली आणि 226 धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना टीम इंडियाला केवळ 225 धावा करता आल्या. तिसरा एकदिवसीय सामना बरोबरीत संपला आणि 3 एकदिवसीय मालिका 1-1 ने बरोबरीत संपली. सामन्याचे पंच मुहम्मद कमरुझमान आणि तनवीर अहमद होते. दोन्ही पंच बांगलादेशचे होते.

# पंत आयपीएल खेळणार नाही?

## » दिल्लीच्या इशांत शर्मा याचे मोठे विधान

। नवी दिल्ली ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) नुकतेच जखमी खेळाडूंचे वैद्यकीय अहवाल जाहीर केले. गेल्या वर्षी कार अपघातात जखमी झालेल्या ऋषभ पंतने पुन्हा फलंदाजीचा सराव सुरू केल्याची माहिती बोर्डाने दिली होती. या बातमीने क्रिकेट चाहत्यांमध्ये आनंदाची लाट पसरली आहे.**



त्यांना वाटते की, पंत आगामी एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेत खेळू शकतो, परंतु भारत आणि दिल्ली कॅपिटल्सचा अनुभवी वेगवान गोलंदाज इशांत शर्मा त्याच्या पुनरागमनाबद्दल फारसा आशावादी नाही. त्याच्यामते तो आयपीएल २०२४मध्ये सुद्धा खेळू शकणार नाही. पंत पूर्णपणे तंदुरुस्त असेल आणि केवळ विश्वचषकासाठीच नव्हे तर पुढील वर्षी होणाऱ्या आयपीएलसाठीही उपलब्ध असेल, अशी इशांतला अपेक्षा नाही. मात्र, ऋषभच्या तब्येतीत सुधारणा होत असल्याने इशांतने दिलासा व्यक्त केला आहे. ३० डिसेंबर २०२२ रोजी दिल्ली-डेहराडून महामार्गावर ऋषभ पंतच्या कारला अपघात झाला. यामध्ये तो गंभीर जखमी झाला. त्याच्या शरीरावर खूप जखमा होत्या. अलीकडेच त्याने एन.सी.ए.मध्ये फलंदाजी आणि विकेटकीपिंग पुन्हा सुरू केल्यानंतर चाहत्यांच्या अपेक्षा वाढल्या आहेत पण पंतची पुनरागमनाची तारीख अजून लांब आहे. "मला वाटतं आम्ही कदाचित पुढच्या आयपीएलमध्ये ऋषभ पंतलाही खेळताना पाहू शकू. कारण, तो किरकोळ दुखापतग्रस्त झालेला नाही. त्याने नुकतीच फलंदाजी आणि यष्टीरक्षणाला सुरुवात केली आहे. धावणे आणि टर्निंगसह अनेक गोष्टी आहेत, जे यष्टीरक्षक आणि फलंदाजासाठी सोपे नाही. त्यामुळे एवढ्या लवकर पंत आपल्याला मैदानात परताना दिसणार नाही."

### काय म्हणाला इशांत शर्मा?

एक चांगली गोष्ट म्हणजे त्याच्यावर दुसरी शस्त्रक्रिया झाली नाही. जर त्याच्यावर दुसरी शस्त्रक्रिया झाली असती तर तो बराच काळ आणखी बाहेर राहिला असता. त्याच्यावर आता एक शस्त्रक्रिया झाली आहे पण मला वाटत नाही की, तो विश्वचषकासाठी निश्चितपणे तंदुरुस्त होईल. आशा आहे की तो आयपीएलसाठी तंदुरुस्त असेल. जर असे झाले तर ते खूप चांगले होईल, मी एक त्याचा मित्र म्हणून नक्कीच स्वागत करेन. मात्र, एवढ्या लवकर त्याचे पुनरागमन होणे अवघड आहे.

# श्रीकांत, प्रणॉय उपउपांत्यपूर्व फेरीत

। नवी दिल्ली ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

भारतीय शटलर्स किदाम्बी श्रीकांत आणि एचएस प्रणॉय यांनी मंगळवारी BWF जपान ओपन सुपर 750 च्या पुरुष एकेरीच्या प्री-क्वार्टर फायनलमध्ये प्रवेश केला. दुसरीकडे, आकर्षी कश्यप जपानच्या स्टार शटलर अकाने यामागुचीविरुद्ध पराभूत होऊन स्पर्धेतून बाहेर पडली. श्रीकांतने टोकियो येथे खेळल्या जात असलेल्या पुरुष एकेरीच्या पहिल्या फेरीत तैवानच्या चाऊ तिएन-चेनचा सरळ गेममध्ये पराभव केला. श्रीकांतने चेनचा 21-13, 21-13 असा पराभव केला.

जागतिक क्रमवारीत 10व्या क्रमांकावर असलेल्या प्रणयने चीनच्या ली शिफेंगचा 21-17, 21-13 असा पराभव करत अंतिम 16 मध्ये स्थान निश्चित केले. प्रणॉयचा उपांत्यपूर्व फेरीत देशबांधव श्रीकांतशी सामना होईल. महिला एकेरीत यामागुचीने आकर्शीचा 17-21, 17-21 असा पराभव केला. महिला दुहेरीत ट्रेसा जॉली आणि गायत्री गोपीचंद पुलेला या भारतीय जोडीने जपानच्या सायाका होबारा आणि सुईझू यांच्याविरुद्ध पहिला गेम गमावल्यानंतर शानदार पुनरागमन केले. ट्रेसा आणि गायत्री या भारतीय जोडीने जपानच्या जोडीचा 11-21, 21-15, 21-14 असा पराभव केला.

मिश्र दुहेरीत, रोहन कपूर आणि एन सिक्की रेड्डी यांना ये होंग वेई आणि ली चिया हसीन या तैवानच्या जोडीविरुद्ध पहिल्या गेममध्ये आघाडी राखता आली नाही. भारतीय जोडीने हा सामना 21-18, 9-21, 18-21 असा गमावला.